पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ध्वजवंदन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह विद्यापीठाचे अधिकारी.

## शिवाजी विद्यापीठात ध्वजारोहण

शिवाजी विद्यापीठात मोठ्या उत्साही वातावरणात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. एम. एस. देशमुख, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, क्रीडा संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालक डॉ. नमिता खोत, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. अभय जायभाये उपस्थित होते.

2 9 JAN 2022
लोकमत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# लक्ष्मणशास्त्रींचे राज्यासाठी योगदान

## सदानंद मोरे : विद्यापीठात ऑनलाईन व्याखानमालेस सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे योगदान अमूल्य आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या १२१ व्या जयंतीनिमित्त आणि आजादी का अमृतमहोत्सव या उपक्रमाअंतर्गत आयोजित ऑनलाईन व्याख्यानमालेचे पहिले पुष्प डॉ. मोरे यांनी गुंफले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

बुद्धी हे राजकारण व परमार्थ यांचे साधन होऊ शकते. बौद्धिक सामर्थ्याने राजकारणात यशस्वी होता येईल, तसेच परमार्थ सुद्धा साधता येईल, अशी धारणा तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची होती. यशवंतराव चव्हाण आणि तर्कतीर्थ यांच्या महाराष्ट्रविषयक संकल्पना समान असल्याचे डॉ. मोरे यांनी सांगितले. अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी प्रास्ताविक केले.

सकाळ



कुरुकली : येथील भोगावती महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या समितीने लेखापरीक्षणामध्ये 'ए' मानांकन दिले.

# भोगावती महाविद्यालयाला 'ए' मानांकन

शाहूनगर : कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयाला शिवाजी विद्यापीठाच्या विद्याविषयक लेखापरीक्षणामध्ये 'ए' मानांकन मिळाले. विद्यापीठाच्या समितीने भेट देऊन लेखापरीक्षण केले. समितीत कासेगाव महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. माने, श्रीमती पुतळाबेन शहा कॉलेजचे प्रा. सुशील कुमार यांचा समावेश होता. महाविद्यालयाला यापूर्वी नॅकचे 'ए' मानांकन मिळाले आहे. त्यासाठी भोगावती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, सर्व संचालक, प्राचार्य आर. ए. सरनोबत, उपप्राचार्य डॉ. एन. एम. पाटील, आर. बी. हंकारे, प्रा. डॉ. डी. ए. चौगुले, प्रा. डॉ. डी. के. दळवी, प्रा. सागर चौगुले, प्रा. एन. के. बनसोडे, प्रा. डी. आर. चांदम, नॅकचे समन्वयक प्रा. व्ही. एस. काळेबाग, ग्रंथपाल पी. एस. कल्लोळी, प्रबधंक अजित कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.